प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांकरीता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये निधी वितरीत करणेबाबत..... लेखाशिर्ष (२२३० ६११८), ३१ सहाय्यक अनुदाने (कार्यक्रम) (वेतनेत्तर)")

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१९/प्र.क्र.७८/(अभियान-१), कौशल्य-१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जानेवारी, २०२१

<u>वाचा</u> : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/ रोस्वरो-१, दिनांक ०२/०९/२०१५.

२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ १२२/अभियान-१, दिनांक १२/०१/२०१७.

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.६४/दिनांक १६/०४/२०२०

४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/दिनांक ०४/०५/२०२०.

५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/दिनांक १०/११/२०२०.

६) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्रमांक MSSDS/ FAA/B/०१/२०२०-२१/८८०, दिनांक २७/१०/२०२० व दिनांक १५/१२/२०२०.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील युवक युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करून त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी **"प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान"** राबविण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियानाकरीता " मागणी क्रमांक क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०८) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान (कार्यक्रम) (२२३० ६११८), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली रुपये १८९.९६ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर निधीपैकी रु.१३.०० कोटी (रु. तेरा कोटी फक्त) इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितिरित करण्याची बाब सदर नस्तीवर विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

वित्त विभागाच्या सं.क्र. ३ येथील शासन परिपत्रकास तसेच सं.क्र. ४ येथील शासन निर्णयास अनुसरुन वित्तीय वर्ष सन २०२०-२१ करीता मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१)(०८) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (कार्यक्रम) (२२३० ६११८), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली निधी प्रलंबित देयके अदा करण्यासाठी, अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या रुपये १८९.९६ कोटी इतक्या निधीपैकी रु.१३.०० कोटी (रुपये तेरा कोटी फक्त ) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२.	शासनाच्या ध्येय व धोरणानुसार कौशल्य विकासाशी निगडीत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) यांना राज्य पातळीवर "नोडल एजन्सी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले असून, सहाय्यक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांनी सदर निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना तात्काळ खर्चासाठी उपलब्ध करून देऊन, या संदर्भातील लेखे त्यांचेकडे अद्ययावत ठेवावेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांची उद्दिष्टनिहाय खर्च करण्याची जबाबदारी राहील. तसेच त्यांनी प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालमर्यादेत शासनास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. उक्त निधी खर्च करताना वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/ शासन परिपत्रकातील तरतुदींचे तसेच वित्तीय अधिकार नियमावलींचे पालन करण्यात यावे.

३.	या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी "मागणी क्रमांक क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०८) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान (कार्यक्रम) (२२३० ६११८), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)")" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय नियोजन विभाग, अनौपचारिक सं.क्र. २८५/१४७१, दिनांक २३/१२/२०२० तसेच वित्त विभाग, अनौपचारिक सं.क्र. ३/व्यय-६/दिनांक १५/०१/२०२१ रोजीच्या मान्यतेस अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या सं.क्र. ३ व ४ येथील शासन निर्णय, परिपत्रकास अनुसरुन व वित्त विभागाच्या दिनांक १७/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-एक, नियम क्रमांक १४९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०१२८११४३५४३७०३ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2021.01.28 11:52:38 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सह सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई

७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१०. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
११. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१२. महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर.
१३. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय मुंबई.
१४. निवड नस्ती - कौशल्य -१